**<u>सी.एन.आर नं.१९०० ०४१० २०२१</u>**

**<u>म.सं.कौ.हिं.का.अर्ज २०/२०२१ नि. २० वरील आदेश</u>**

अर्जदारातर्फे प्रस्तूतचा अर्ज हा तिचा मुलगा पृथ्वीराज याचा ताबा मिळण्यासाठी व मुलाला भेटण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदाराच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे,

अर्जदार व सा.वाले नं.१ पोपट हे पती पत्नी असून त्यांचे नाते आजही अस्तित्वात आहे. अर्जदार व सा.वाले यांना अर्जदारापासून अर्णव वय ७ वर्षे व पृथ्वीराज वय ९ वर्षे अशी दोन मुले झालेली आहेत. तसेच पृथ्वीराज हा अर्जदार हिचेपासून वेगळा सा.वाला नं.१ याचेकडे राहत आहे. सा.वाले यास अर्जदार हिने पृथ्वीराज यास भेटण्यासाठी वेळोवेळी विनंती केली परंतु सा.वाला याने जाणीवपूर्वक भेट होवू दिली नाही.

**३.** पृथ्वीराज हा अज्ञान असून त्यास त्याची आई अर्जदार नं.१ हिच्या प्रेमाची नैसर्गिकपणे अत्यंत आवश्यकता आहे म्हणून अर्जदार हिने सदरचा अर्ज हा पृथ्वीराज याचा ताबा मिळणेसाठी अथवा त्याला भेटण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**४.** सदरील अर्जावर सा.वाला याचे म्हणणे मागवण्यात आले. सा.वाले याने नि.२५ वर त्याचे म्हणणे दिले आहे. सा.वाले याचे म्हणण्यानुसार अर्जदाराचा सदरचा अर्ज हा खोटा, बोगस दाखल केलेला आहे. तसेच तो सा.वाले यास मान्य व कबूल नाही. त्याचप्रमाणे अर्जदार हिने वेगळी पोटगी मिळावी या एकमेव हेतूने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच पृथ्वीराज हा अज्ञान असून त्याचे पालणपोषण, शाळेचा खर्च हा सा.वाला व त्याचे आई-वडील करत आहेत. तसेच पृथ्वीराज यास अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास त्याचे शैक्षणिक नुकसान होईल. म्हणून सदरचा अर्ज रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

**५.** अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला अर्जदाराने सदरील अर्ज हा पृथ्वीराज याचा ताबा मिळणेसाठी अथवा ताबा न मिळाल्यास त्याला भेटण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जदार हिने सदरील प्रकरण कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ कलम १२,१५,१७,१८,२०,२२,२६ प्रमाणे दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार हिची नि.२० वरील अर्जातील कथनानुसार तिला तिचा मुलगा पृथ्वीराज वय ९ वर्षे याचा ताबा हवा आहे. अर्जदाराचे कथनानुसार ती पृथ्वीराज याची नैसर्गिक पालक असल्याकारणाने तिला पृथ्वीराज याला भेटण्याचा अथवा त्याचा ताबा मागण्याचा अधिकार आहे. सा.वाला याच्या युक्तीवादानुसार पृथ्वीराज हा इयत्ता चौथीमध्ये शिक्षण घेत असून त्याचा ताबा अर्जदार हिच्याकडे दिल्यास त्याचे शैक्षणिक नुकसान होवू शकते. सदरील प्रकरणानुसार अर्जदार हिने सा.वाल्याकडे आर्थिक सहाय मागितलेले आहे.

**६.** वरील सर्व बाबींचा विचार करता पृथ्वीराज याचे शिक्षण सुरू असून त्याच्या शिक्षण व संगोपनाचा संपुर्ण खर्च हा सा.वाला करत असल्याचे दिसते सदरील बाब लक्षात घेता पृथ्वीराज याचे शिक्षणासाठी व त्याचे शैक्षणिक नुकसान होवू नये या कारणास्तव पृथ्वीराज याचा ताबा सा.वाला याचेकडेच ठेवण्यात येत आहे. परंतु अर्जदार ही पृथ्वीराज याची आई असल्याने नैसर्गिक प्रेम व आपुलकी या नात्याने व नैसर्गिक न्यायतत्वानुसार तिला तिच्या मुलाला भेटण्याचा अधिकार नाकारता येणार नाही. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदाराचा अर्ज अशंत: मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार हिला पृथ्वीराज यास आठवडयाच्या दर शनिवारी न्यायालयीन कामकाजाच्या दिवशी अडीच वाजलेपासून ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत न्यायालयाचे परिसरात भेटण्याची परवानगी देण्यात येते.

३. सा.वाले यास असे आदेशित करण्यात येते की, त्याने दर शनिवारी न्यायालयीन कामकाजाचे दिवशी दुपारी अडीच वाजता न्यायालयात आणून सोडावे तसेच अर्जदार व पृथ्वीराज याने एकांतात भेटू दयावे.

दिनांक : ०४/०२/२०२३

व्ही.बी.डोंबे
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
शेवगाव

01. Plaintiff has filed this application under Order VI, Rule 17 of C.P.C. for amendment of plaint. Application supported with affidavit. Defendants resisted the application by filing say on the application itself.

02. Heard. Perused record.

03. The present suit is filed by the plaintiff for perpetual injunction. By the proposed amendment plaintiff wants to alter the are of suit property I.e from 1 H 06 R. to 1 H 05 R. it is the contention of the plaintiff that the area 1 H 06 R. is mentioned only due to technical mistake and it is just a typographical mistake. add only ancestral property which has left to be added my mistake at time of institution of suit. Hence by the proposed amendment nature of suit will not change so as to prejudice defendants because in partition suit both parties stand on the same footing. Hence, for aforesaid reasons application is justified. Therefore, I pass the following order.

**O R D E R**

(1) Application is allowed as under :-

(2) Plaintiff is allowed to carry out amendment as prayed for within 14 days from the passing of this order.

(3) Costs to cause in suit.

(4) Plaintiff to comply Order-I, Rule 10 (4) of C.P.C. and issue suit summons to all defendants after amendment of plaint.

Place : Shevgaon
Date : 29/09/2021

(Shrikant Ade)
Civil Judge Junior Division,
Shevgaon.